


**सोलापूर : भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्कारप्राप्त डॉ. राघवेंद्र कोथूर राव, प्रा. अनिल अंकुलकर, प्रशांत माणिकशेटे, दीपक कलढोणे, बलराजसिंह बायस, शीतल जमगे यांच्यासोबत प्रा. साळुंके, सुशील गायकवाड, डॉ. रणजित गांधी, प्रदीप पंडित.**

# भाऊसाहेब यांच्या कार्यातून सेवाभावाची प्रेरणा मिळते

**सोलापूर : प्रतिनिधी**

श्री ऐ.प.दि. जैन पाठशाला संस्थेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना भाऊसाहेब गांधी यांनी संस्थेची धुरा कौशल्यपूर्वक हाताळली आणि अवघ्या काही वर्षांत संस्थेला नावारूपास आणले. त्यांच्या कार्यपध्दतीतूनच सेवाभावाची प्रेरणा मिळत असते, अशा शब्दांत भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्कार विजेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

हिरालाल ऊर्फ भाऊसाहेब गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून श्री ऐ.प.दि. जैनपाठशालासेवकांचीसहकारीपतसंस्थेच्यावतीनेप्रतिवर्षाप्रमाणे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण मध्य रेल्वेचे वरिष्ठ मंडल परिचालन प्रबंधक सुशील गायकवाड यांच्या हस्ते झाले. सहा विभागांतून दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे स्वरुप पाच हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे होते. वरिष्ठ महाविद्यालयाचा पुरस्कार वालचंद आर्ट अँड सायन्सचे डॉ. राघवेंद्र कोथूर राव व वालचंद अभियांत्रिकेचे प्रा. अनिल अंकुलकर, कनिष्ठ महाविद्यालयातून श्री दिगंबर जैन गुरुकुलचे प्रशांत माणिकशेटे व दीपक कलढोणे, सेवाभावी शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वालचंद अभियांत्रिकीचे बलराजसिंह बायस आणि कुंथलगिरी येथील देशभूषण विद्यालयाचे शीतल जमगे यांना देण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी होते. यावेळी प्रा. शंकरराव साळुंके, पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पंडित, संस्थेचे विश्वस्त पृथ्वीराज गांधी, विक्रम गांधी, वैभव गांधी, ब्रिजेश गांधी, खजिनदार भूषण शहा, पराग शहा आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती. याप्रसंगी सुशील गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. बळवंत जोशी यांनी स्वागत गीत गायले. प्रास्ताविक डॉ. प्रा. भीमाशंकर बिराजदार यांनी, तर पुरस्कार वाचन प्राचार्य डॉ. अजित माणिकशेटे यांनी केले.